# खान्देशरत्न

## वर्धापनदिन विशेष २०१५



जळगाव तरुण भारत

चांगल्या शिक्षणासाठी चांगली शाळा आणि चांगले गुरु मिळणे आवश्यक असते. प्रत्येक विद्यार्थ्यांला त्याच्या मनातली शाळा मिळेलच असे नाही. मात्र, जळगावची आंतरराष्ट्रीय 'अनुभूती निवासी स्कूल' ही अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नातील शाळा ठरू शकते. या शाळेची अनेक वैशिष्ट्ये आहेत. जैन उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांच्या कल्पनेतून ही शाळा साकारली आहे. जीवन शिक्षण आणि कौशल्यपूर्ण शिक्षण देणाऱ्या या शाळेचा प्रवासच अनोखा आहे.



## शाळा प्रवेशापासून उत्तम करियरचा सुलभ आणि भक्कम मार्ग

# जळगावची अनुभूती निवासी स्कूल

पालकांसाठी शाळा निवडणे हा जटिल प्रश्न असतो. शाळेमध्ये प्ले-ग्रुपला ॲडमिशन घेऊन, दहावी, बारावीपर्यंतच्या शाळेची निश्चिती करण्यात अनेक पालकांची दमछाक होते. शाळा कुठली निवडायची, मराठी का इंग्रजी, डे स्कूल आहे की निवासी, खासगी का मान्यवर संस्थेची अनुदानित, घरापासून शहरापाहून किंवा राज्यापासून किती जवळची का लांब, वाहतुकीची सोय कुठली, शाळेचा परिसर कसा आहे, वातावरण कसे आहे शाळेचे, शाळेचा शैक्षणिक, सामाजिक दर्जा कसा आहे आदी गोष्टींचा पालक विचार करतात.

याशिवाय शाळेचा समाजात नावलौकीक कसा आहे, तज्ज्ञ शिक्षक कसे आहेत, मुख्याध्यापक कसे आहेत, सोयी सुविधा कशा आहेत, क्रीडा विषयक सुविधा आणि त्यांची उपलब्धता कशी आहे. आत्तापर्यंत कला, क्रीडा व शैक्षणिक बाबतीत शाळेचे विद्यार्थी नावाजलेले आहेत का? याचा सुद्धा विचार पालक करत असतात. शाळा सर्व सोयींनी युक्त, शैक्षणिकदृष्ट्या चांगली, विद्यार्थ्यांशी प्रेमाने आणि आपुलकीने वागणारा शिक्षक, कर्मचारी वर्ग असला पाहिजे याचे सकारात्मक उत्तर म्हणजे अनुभूती स्कूल. पालक व पाल्य यांनी अनुभूती निवासी स्कूलची यासाठी निवड करून निश्चिंत व्हावे अशीच ही स्कूल आहे.

निवासी स्कूल म्हटले म्हणजे आईवडिलांच्या मायेच्या छत्रापासून दूर. शिक्षणासाठी हाही अनुभव घेणे आवश्यक आहे. सुरुवातीला मुले





बिचकतात, बिथरतात. परंतु अनुभूती निवासी स्कूलमध्ये विद्यार्थी आल्यावर त्याला या निसर्गरम्य वातावरणात, शाळाखोल्या, क्रीडांगण, अभ्यासेतर उपक्रम इत्यादीमध्ये ते हरखून जातात. अनुभूती स्कूलमध्ये अॅकेडमिक विषय शिकविले जातात. पुस्तकी शिक्षणाबरोबर दैनंदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी अनुभूती स्कूलमध्ये शिकविल्या जातात. अनुभवावर आधारित शिक्षण पद्धतीमुळे हसत खेळत विषयाचे सहज आकलन होतात. याच गोष्टीमुळे अनुभूती स्कूलचा दहावी, बारावीचा निकाल सातत्याने शंभर टक्के लागतो. त्यातील बहुतांश विद्यार्थी विशेष प्रावीण्याचे गुण मिळविलेले आहेत.

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन यांनी २००७ मध्ये सुरु केलेल्या या स्कूलचा नावलौकीक भारतभर झाला आहे. अनुभूती स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास सततच्या प्रयत्नाने साध्य होण्याचे सौभाग्य या स्कूलच्या माध्यमातून मिळाले आहे. विद्यार्थ्यांना शक्तीशाली, सामर्थ्यशाली बनविण्यात महत्त्वाची भूमिका अनुभूती स्कूलची आहे हाच विशाल दृष्टीकोन ठेऊन अनुभूती स्कूलच्या संचालिका सौ. निशा जैन आहेत. पालकांनी या विद्यालयाची निवड आपल्या मुलांच्या चांगल्या, उज्ज्वल भवितव्यासाठी केली तर आजचा शिक्षणाचा खर्च ही मोठी गुंतवणूक ठरेल यात शंका नाही. या स्कूल विषयी अधिक माहिती http://www.anubhutischool.in अथवा ०२५७ २२६४६०० अथवा जनसंपर्क अधिकारी खंबायत ९४२२७७६७२६ यांच्याशी संपर्क साधता येईल.


**– किशोर कुळकर्णी,**
**प्रसिद्धी विभाग जैन इरिगेशन जळगाव.**



## अनुभूतीचे अंतरंग










### गरीबांसाठी जागतिक शिक्षण

पद्मश्री डॉ.भवरलाल जैन यांनी कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या अपेक्षेने शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला. मात्र तसे करीत असताना गरीबांच्या व मध्यमवर्गीयांच्या मुलांनाही परवडेल असे शिक्षण दिले जावे, या हेतूने अनुभूती निवासी शाळा सुरु केली. त्याचाच पुढील भाग म्हणून सर्वसामान्यांसाठी शहरात अनुभूती २ ही शाळा सुरु केली आहे.

सरकारी नोकरीवर पाणी सोडून पुन्हा जन्मभूमी गाठली. प्रसिद्ध जैन उद्योग समूहात नोकरी करुन समाजाला परिवर्तनाच्या दिशेने घेवून जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरु ठेवला. समाजातील दीन-दलित यांची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली. त्यातून अनेकांना उभे केले. अपंगांसाठी स्वत:च्या पगारातून सायकल घेवून दिल्यात. हे करण्यामागे कुठलाही स्वार्थ न पाहता केवळ आणि केवळ समाजसेवा हा भाव मनी बाळगली आणि त्याला विविध वलय निर्माण झाले. फारुक शेख नावाच्या व्यक्तिचा हा जीवनपट खरोखरच कौतुकास्पद आहे.



## समाजाला परिवर्तनाच्या दिशेने घेऊन जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे

# ऑलराऊंडर व्यक्तिमत्त्व : फारुक अब्दुल्ला शेख

फारुक अब्दुला शेख यांचा जन्म दि. १० एप्रिल १९६२ रोजी जळगाव येथील पोलीस मुख्यालय वसाहतीत झाला. प्राथमिक शिक्षण भुसावळ नगरपालिकेच्या शाळेत झाले. पुढील शिक्षण जळगाव महानगरपालिकेच्या शाळेत झाले. एम. कॉम पर्यंतचे शिक्षण एम. जे. महाविद्यालयात झाले. त्यानंतर राज्य परिवहन महामंडळात लिपीक या पदावर नियुक्ती झाली. महामंडळात सुरक्षा आणि दक्षता अधिकारी म्हणून भंडारा, कोल्हापूर येथे सेवा बजावली. १९९४ साली कोल्हापूर विभागातून स्वेच्छानिवृत्ती घेऊन जळगाव येथील जैन उद्योग समुहात नोकरी करण्याची संधी मिळाली. महाविद्यालयीन जीवनात अनेक क्रिडांगणे गाजविली असल्याने खेळामध्ये रुची होतीच. जैन इरिगेशनच्या माध्यमातून क्रिडा क्षेत्रातही काम करण्याची संधी उपलब्ध झाली. जैन उद्योग समुहाचे उपाध्यक्ष अशोक जैन यांना समाजसेवेची आवड असल्याने त्यांच्या सानिध्यात राहून समाजसेवेचीही गोडी निर्माण झाली. प्रशासकीय कामाचा अनुभव, क्रिडा, समाजसेवा या साऱ्या क्षेत्रातील ते ऑलराऊंडर व्यक्तीमत्त्व ठरले आहे.

फारुक शेख यांनी १२ वी ला असताना विभागीय हॉकी, फूटबॉल स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले. एफ. वाय. ते एम. कॉम दरम्यान, हॉकी, फूटबॉल, ॲथेलेटीक्समध्ये जळगाव विभागाचे यशस्वी नेतृत्त्व केले. १९८१-८२ दरम्यान १८ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियनतर्फे महाराष्ट्र राज्याचे हॉकीमध्ये प्रतिनिधीत्व करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. १९८२ ते १९८४ मध्ये हॉकीमध्ये पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व, १९८४ साली आंतरभारतीय विद्यापीठ स्पर्धेत पुणे विद्यापीठाला विजय मिळवून देत सुवर्णपदक प्राप्त केले. १९८१ ते १९८४ दरम्यान, पुणे विद्यापीठाअंतर्गत झालेल्या फूटबॉल व १०० मीटर धावणे, ४x१० मिटर रिले संघाचेही प्रतिनिधीत्व केले. त्यांच्याच प्रतिनिधीत्वात १९८१ साली जळगाव जिल्हा क्रिडा संघाला उत्कृष्ठ खेडाळू म्हणून गौरविण्यात आले.

शेख हे मध्य महाराष्ट्र बुध्दीबळ संघटनेचे सचिव, महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे संचालक, महाराष्ट्र राज्य लंगडी असोसिएशनचे संचालक आदींसह जळगाव जिल्ह्यातील जवळ जवळ सर्वच क्रिडा संघटनांमध्ये विविध पदांवर कार्य करीत आहेत. जिल्ह्याचे नाव देशपातळीवर नेण्याचा व खेडाळूंना सर्वोतोपरी न्याय देण्याचा प्रयत्न ते करीत आहेत.

जैन स्पोर्टस् अकॅडमीच्या माध्यमातून दि. २६ जानेवारी रोजी शहरातील सर्वच दैनिकांच्या प्रतिनिधींसाठी क्रिकेट, बुध्दीबळ, बॅटमिंटन यासारख्या विविध स्पर्धा घेवून राज्यात नव्हे तर देशात त्यांनी एक नवीन पायंडा पाडला आहे.

समाजाचे काही देणे लागतो या हेतूने ते समाजाची सेवा देखील करीत असतात. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना मदत झाली आहे. 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे' या भावनेतून त्यांचे कार्य सुरु आहे. जळगाव जिल्हा मुस्लिम मनियार बिरादरीचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मनियार जमात फेडरेशनचे उपाध्यक्ष म्हणून शेख कार्यरत आहेत. समाजाच्या संघटनांवर











कार्यरत असले तरी सर्व जाती-धर्मातील अंध, अपंग, गरिबांसाठी ते एक मदतकर्ते आहेत. कोणताही धार्मिक दृष्टीकोन न बाळगता ते नेहमी शहरातील अपंग बांधवांना तीन चाकी सायकलींचे वाटप करीत असतात. आजकाल समाजसेवा म्हणजे एक फॅशन झाली आहे. समाजसेवा म्हणजे काय? हेच अनेकांना माहित नाही. भिकाऱ्याला भीक देणे, भुकेल्याला अन्न देणे, मोर्चांमध्ये सहभागी होणे, नदी नाल्यांसाठी आंदोलने करणे सारख्या गोष्टी करणे म्हणजे समाजसेवा होय असे मानणारे भरपूर असतील. खरा सामाजिक कार्यकर्ता कोणतेही सामाजिक कार्य जात-धर्म, भेदाभेद न पाळता करत असतो. सामाजिक कार्यकर्ता नेहमी समाज प्रबोधन करत असतो आणि समाज परिवर्तनाच्या मार्गाने वाटचाल करीत असतो. समाज परिवर्तन हे दीर्घकाळ असते असे ते नेहमी सांगतात.



एखाद्या भिकाऱ्याला रुपया देतो पण त्या रुपयाने त्याची परीस्थिती सुधारणार आहे असे नाही, तो पुन्हा भिकच मागणारच. मग त्याला एक रुपया देऊन कोणती समाजसेवा झाली? देशात कोणावर भीक मागण्याची वेळच येऊ नये असे काम करावे, म्हणजेच समाज परिवर्तन होईल असे ते मानतात.



फारुक शेख यांनी सामाजिक व जातीय सलोखा राखण्यासाठी 'इंसाफ लाओ देश बचाओ, हिंदू-मुस्लिम नफरत मिटाओ', राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धेचे आयोजन, जिल्हा पोलीस दल व उपप्रादेशिक परिवहन विभागातर्फे आयोजित 'रस्ता सुरक्षा सप्ताह', मिरगी रोगाचे शिबिर यासारखे विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले आहेत. त्यामुळे त्यांना विविध सामाजिक संघटना, जिल्हा महसूल विभाग, जिल्हा पोलीस दलातर्फे समाजचिंतामणी, समाजभूषण, मजरूह अवार्ड, उत्कृष्ठ आयोजक, क्रिडा विशेष पुरस्कार यासारखे १७ वर पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.




• महात्मा गांधी यांच्या जीवन कार्यावर आधारित जागतिक एकमेव ऑडियो गाईडेड संग्रहालय • महात्मा गांधी वरील भव्य ग्रंथालय व अभिलेखागार • गांधी विचार व सामाजिक विज्ञान विषयात पदव्युत्तर व गांधी समाजकार्य विषयात डिप्लोमा पाठ्यक्रम • महिला सशक्तीकरण व ग्रामविकास कार्यक्रम • व्याख्यानमाला, चर्चा व शिबिरांचे आयोजन
• विद्यार्थी व बंदीजनांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन
• ग्रीन बिल्डींगसाठी ग्रीहाद्वारा पंचतारांकित मानांकन

*जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. आणि भवरलाल ॲन्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम*

फक्त सोमवार सोडून दररोज सकाळी ९.३० ते सायं. ६ पर्यंत खुले



## गांधी रिसर्च फाऊंडेशन

गांधी–तीर्थ, जैन हिल्स, जळगाव–४२५००१ (महाराष्ट्र) भारत
दूरध्वनी: +९१ २५७ २२६४९३९,
+९१ ९४०४९५५२२०, +९१ ९४०४९५५२७२
इ–मेल: info@gandhifoundation.net
वेबसाइट: www.gandhifoundation.net

JAINART